सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.

डॉ. सविता कुलकर्णी
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

**संदर्भ क्र. विविमं/२०२५-२६/२६८** **दि. १०/१०/२०२५**

**प्रति,**
**मा. प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख,**
**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित**
**सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था,**
**विद्यापीठ परिसरातील सर्व शैक्षणिक विभाग.**
**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.**

**विषय : युनेस्कोने जागतिक वारसा घोषित १२ दुर्गांना मानवंदना देण्यासाठी "दुर्गोत्सव" साजरा करणेबाबत...**
**संदर्भ क्र. मा. सहसंचालक उच्चशिक्षण पुणे विभाग, यांचे ससं/उशि/पुवि/परिपत्रक/२०२५/ई२३०९८०९ दि. १०/१०/२०२५ रोजीचे पत्र.**

**महोदय/महोदया,**

मा. मुख्यमंत्री महोदयांनी युनेस्कोने जागतिक वारसा स्थळांच्या यादीत समावेश केलेल्या शिवछत्रपतीच्या १२ दुर्गाना एक मानवंदना देण्यासाठी "दुर्गोत्सव" हा उपक्रम, लोकोत्सव म्हणून साजरा करण्यास मान्यता प्रदान केलेली आहे. शिवछत्रपतींच्या रायगड, राजगड, प्रतापगड, सिंधुदुर्ग, साल्हेरदुर्ग, खांदेरीचा दुर्ग, जिजी, पन्हाळगड, शिवनेरी, विजयदुर्ग, लोहगड, सुवर्णदुर्ग या १२ दुर्गांना मानवंदना देण्यासाठी म्हणून "दुर्गोत्सव" हा उपक्रम साजरा करणे बाबतची संहिता व वेळापत्रक सोबत जोडलेल्या पत्रातील परिशिष्ठ "अ" मध्ये देण्यात आलेला आहे. "दुर्गोत्सव" हा उपक्रम लोकोत्सव म्हणून साजरा करणेबाबत सर्व अकृषी विद्यापीठे आणि त्यांचेशी संलग्नित महाविद्यालये यामधील विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणावर सहभागी करुन घेण्याचे शासनाने निर्देश दिलेले आहेत. याबाबतचे पत्र आपल्या माहिती व उचित कार्यवाहीसाठी सोबत जोडलेले आहे.

शासन निर्देशानुसार आपल्या महाविद्यालय/परिसंस्थाच्या/विभागातील विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणावर सहभागी करुन "दुर्गोत्सव" हा उपक्रम साजरा करावा. "दुर्गोत्सव" हा उपक्रम वरील सर्व घटकापर्यंत पोहोचवण्याकरीता या संदर्भातील शासनाचे निर्देश आपल्या महाविद्यालय/परिसंस्था/विभागाच्या मुख्य सूचनाफलकांवर तसेच जिथे विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी एकत्र येत असतात (उदा. ग्रंथालय/वाचनकक्ष/वर्गखोल्या/विश्रांतीगृह/उपहारगृह/वसतिगृह) अशा दर्शनी भागात प्रदर्शित करून सर्व विद्यार्थ्यांना व इतर सर्व सदस्यांच्या निदर्शनास आणून "दुर्गोत्सव" हा उपक्रम साजरा करण्याबाबत सूचित करावे.

"दुर्गोत्सव" हा उपक्रम विद्यार्थी, विद्यार्थी कल्याण अधिकारी, संबंधित शैक्षणिक विभाग यासह आपले महाविद्यालय/परिसंस्थातील उर्वरित शैक्षणिक तथा सह शैक्षणिक विभाग, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सामुहिक सहभागातून यशस्वी करण्याबाबत आपण आपल्या स्तरावर योग्य ती कार्यवाही करावी.

कळावे, हि विनंती.

**सोबत : वरीलप्रमाणे.**

**(डॉ. सविता कुलकर्णी)**
संचालक, (अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ

**महाराष्ट्र शासन**
**सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग,**
**१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-१**
**Web-www.jdhepune.in** **E-mail:jdhepune@gmail.com**
फोननं. ०२०-२६१२७८३३, २६०५१६३२, फॅक्सनं. ०२०-२६१२७८३३

जा.क्र.ससं/उशि/पुवि/ परिपत्रक/२०२५/ई२३०९८०९ दि. १०-१०-२०२५

प्रति,

१. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
२. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
३. कुलसचिव, सर्व अकृर्षि अभिमत व खाजगी विद्यापीठे/संस्था, पुणे.
४. प्राचार्य /प्राचार्य, अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र, समाजकार्य, व शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालये,**पुणे, अहिल्यानगर व नाशिक जिल्हे.**

**विषय:- "युनेस्कोने जागतिक वारसा म्हणून घोषित केलेल्या शिवछत्रपतींच्या १२ दुर्गांना एक अभुतपूर्व अशी मानवंदना देण्यासाठी दुर्गोत्सव साजरा करण्याबाबत.**

संदर्भः-१. मा. उच्च शिक्षण संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/दुर्गोत्सव/परिपत्रक/मवि-१/२०२५/ई-२२९४४६३, दि. ०९-१०-२०२५
२. शासन पत्र क्र.संकीर्ण-२०२५/ई.१३८७७०२७/विशि-५ दि. ०९-१०-२०२५
३. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे अ.शा.पत्र क्र.अमृत २०२५/प्र.क्र. १०२/संस्था, दि. ०७-१०-२०२५

उपरोक्त संदर्भिय विषयाबाबत मा. उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांचेकडील दि. १०-१०-२०२५ परिपत्रकासोबत दि. ०९-१०-२०२५ शासन पत्र व दि. ०७-१०-२०२५ च्या मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या पत्राचे कृपया अवलोकन करावे.

या परिपत्रकान्वये मा. मुख्यमंत्री महोदयांनी युनेस्कोने जागतिक वारसा स्थळांच्या यादीत समावेश केलेल्या शिवछत्रपतींच्या १२ दुर्गांना एक मानवंदना देण्यासाठी "दुर्गोत्सव" हा उपक्रम, लोकोत्सव म्हणून साजरा करण्यास मान्यता प्रदान केलेली आहे. शिवछत्रपतींच्या रायगड, राजगड, प्रतापगड, सिंधुदुर्ग, साल्हेरदुर्ग, खांदेरीचा दुर्ग, जिंजी, पन्हाळगड, शिवनेरी, विजयदुर्ग, लोहगड,

सुवर्णदुर्ग या १२ दुर्गांना मानवंदना देण्यासाठी म्हणून "दुर्गोत्सव" हा उपक्रम साजरा करणे बाबतची संहिता वेळापत्रक संदर्भिय पत्रासोबत जोडलेल्या पत्रातील परिशिष्ठ "अ"' मध्ये देण्यात आले आहे.

"दुर्गोत्सव" हा उपक्रम लोकोत्सव म्हणून साजरा करणेबाबत सर्व अकृषी विद्यापीठे आणि त्यांचेशी संलग्नित महाविद्यालये यामधील विद्यार्थ्यांना मोठया प्रमाणावर सहभागी करुन घेण्याचे निर्देश संदर्भ क्र. ०३ अन्वये प्राप्त झाले आहेत.

त्यानुषंगाने सदर उपक्रमामध्ये आपल्या सर्व विद्यापीठातील तसेच महाविद्यालयांमधील सर्व अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थ्यांचा मोठया प्रमाणावर सहभागी करुन घेण्यासाठी आपल्यास्तरावरुन आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्यात यावी.

**सोबत :** परिपत्रक व शासन पत्रे.

Digitally signed by
Ashok Uddhav Ubale
Date: 12-10-2025
14:31:36

**(डॉ. अशोक उबाळे)**
सहसंचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे

# महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य,

**४१२,ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजी नगर, पुणे-४११०१६**

**Web : www.dhepune.gov.in** **E-Mail : mavi.dhepune@gov.in**

फोन नं.०२०/२६१२२११९


क्र.: उशिसं/दुर्गोत्सव/परिपत्रक /मवि-१/२०२५/ई. २२९४४६३ दि. ०९/१०/२०२५

### परिपत्रक

विषयः- "युनेस्कोने जागतिक वारसा म्हणून घोषित केलेल्या शिवछत्रपतींच्या १२ दुर्गांना एक अभुतपूर्व अशी मानवंदना देण्यासाठी दुर्गोत्सव साजरा करण्याबाबत.

वाचा:- १.शासन पत्र क्र.संकीर्ण-२०२५/ई.१३८७०२७/विशि-५ दि.९.१०.२०२५

२.मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे अ.शा.पत्र क्र.अमृत-२०२५/प्र.क्र.१०२/ संस्था, दि.७.१०.२०२५

उपरोक्त वाचा येथील १ व २ पत्राची प्रत सोबत जोडली आहे. कृपया अवलोकन करावे.

मा. मुख्यमंत्री महोदयांनी युनेस्कोने जागतिक वारसा स्थळांच्या यादीत समावेश केलेल्या शिवछत्रपतींच्या १२ दुर्गांना एक मानवंदना देण्यासाठी "दुर्गोत्सव" हा उपक्रम, लोकोत्सव म्हणून साजरा करण्यास मान्यता प्रदान केलेली आहे. शिवछत्रपतींच्या रायगड, राजगड, प्रतापगड, सिंधुदुर्ग, साल्हेरदुर्ग, खांदेरीचा दुर्ग, जिंजी, पन्हाळगड, शिवनेरी, विजयदुर्ग, लोहगड, सुवर्णदुर्ग या १२ दुर्गांना मानवंदना देण्यासाठी म्हणून "दुर्गोत्सव" हा उपक्रम साजरा करणे बाबतची संहिता वेळापत्रक वाचा येथील सोबत जोडलेल्या पत्रातील परिशिष्ठ "अ" मध्ये देण्यात आले आहे.

"दुर्गोत्सव" हा उपक्रम लोकोत्सव म्हणून साजरा करणेबाबत सर्व अकृषी विद्यापीठे आणि त्यांचेशी संलग्नित महाविद्यालये यामधील विद्यार्थ्यांना मोठया प्रमाणावर सहभागी करुन घेण्याचे निर्देश संदर्भ क्र.२ अन्वये प्राप्त झाले आहेत.

त्यानुषंगाने सदर उपक्रमामध्ये आपल्या विद्यापीठातील तसेच सलंग्नित सर्व महाविद्यालयांमधील सर्व अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थ्यांचा मोठया प्रमाणावर सहभागी करुन घेण्यासाठी आपल्या स्तरावरुन आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्यात यावी.

Digitally signed by
SHAILENDRA KAMLAKAR DEOLANKAR
Date: 10-10-2025 17:42:42

**(डॉ. शैलेंद्र देवळाणकर)**
प्र.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे -१६.

प्रति,

१. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.

२. कुलसचिव, सर्व अकृषी/अभिमत/स्वयंअर्थसहायित विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य

३. प्राचार्य, सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित महविद्यालये.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार, कक्ष क्रमांक-४२१,
चौथा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,मुंबई-४०० ०३२
दूरध्वनी क्र ०२२-२२७९३१७१ Email ID : vishi५.hted-mh@mah.gov.in

---

क्र. संकीर्ण- २०२५/ई-१३७८०२७/विशि-५ दिनांक : ०९/१०/२०२५

प्रति,

१) संचालक, उच्च शिक्षण, पुणे.
२) संचालक, तंत्र शिक्षण, मुंबई.
३) संचालक, कला संचालनालय, मुंबई.
४) कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे.

विषय : युनेस्कोने जागतिक वारसा म्हणून घोषित केलेल्या १२ दुर्गांना मानवंदना देण्यासाठी "दुर्गोत्सव" साजरा करणेबाबत.

संदर्भ: मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे अ.शा. पत्र क्र. अमृत-२०२५/प्र.क्र.१०२/संस्था, दि. ०७.१०.२०२५

महोदय,

संदर्भाधीन पत्रान्वये युनेस्कोने जागतिक वारसा स्थळांच्या यादीत समावेश केलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ दुर्गांना मानवंदना देण्यासाठी "दुर्गोत्सव" हा उपक्रम लोकोत्सव म्हणून साजरा करणेबाबत सर्व अकृषी विद्यापीठे आणि त्यांचेशी संलग्नित महाविद्यालये यामधील विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणावर सहभागी करून घेण्याचे निर्देश दिलेले आहेत. दुर्गोत्सव साजरा करणेबाबतची संहिता आणि वेळापत्रक सोबत जोडले आहे.

तरी सदर बाब तातडीने सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून "दुर्गोत्सव" मोठ्या प्रमाणावर साजरा होण्याच्या अनुषंगाने त्यामध्ये आपल्या विद्यार्थ्यांचे योगदान राहील, यासाठी आपण आवश्यक ती कार्यवाही करावी, ही विनंती.

आपला,

(प्रविण अकोलकर)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

सोबत - वरीलप्रमाणे

प्रत - १. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.

२. प्रधान सचिव, इमाव बहुजन कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई.

३. व्यवस्थापकीय संचालक, अमृत, पीएमआरडीए बिल्डींग, ५वा माळा, औंध, पुणे ४११००७

४. सर्व सहसचिव/उपसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग.

अ.शा.:पत्र क्र.अमृत -२०२५/प्र.क्र.१०२/संस्था
इतर मागास बहुजन कल्याण विभाग,
मोती महल, २ रा मजला, १९५,
जे.टाटा रोड, चर्चगेट, मुंबई ४०००२०.
दि. ७/१०/२०२५.

महाराष्ट्र शासन

**राजेश कुमार**
मुख्य सचिव

**विषय:**-युनेस्को ने शिवछत्रपतींच्या १२ दुर्गांना जागतिक वारसा म्हणून घोषित केलेले आहे. त्यांना जनसमान्यांतून एक अभूतपूर्व अशी मानवंदना देण्यासाठी "दुर्गोत्सव" साजरा करणेबाबत.

**संदर्भ:**-मा. मुख्यमंत्री कार्यालयाचे पत्र इ ऑफिस क्र.८९९४७८६, दि. १२.०९.२०२५

प्रिय वेणुगोपाल,

संदर्भांकित पत्रान्वये मा. मुख्यमंत्री महोदय यांनी युनेस्कोने जागतिक वारसा स्थळांच्या यादीत समावेश केलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या बारा दुर्गांना मानवंदना देण्यासाठी "दुर्गोत्सव" हा उपक्रम लोकोत्सव म्हणून साजरा करण्यास मान्यता प्रदान केलेली आहे.

शिवछत्रपतींच्या दुर्गांना दुर्गोत्सवातून दिलेल्या मानवंदनेतून विश्वविक्रम प्रस्थापित केला जाणार आहे. यासाठी राज्यातील सर्व स्तरातील जनतेचा सहभाग होणे अपेक्षित आहे. दुर्गोत्सव साजरा करणे बाबतची संहिता व वेळापत्रक या सोबत "परिशिष्ठ 'अ'" मध्ये देण्यात येत आहे. आपले आधिनस्त सर्व अधिकारी कर्मचारी तसेच सर्व विद्यापीठे, अभिनित विद्यापीठे, अनुदानित विना अनुदानित महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा मोठ्या प्रमाणावर सहभागी करून घेण्यासाठी आपले स्तरावरून सर्व संबंधितांना आवश्यक त्या सूचना देण्यात याव्यात.

दुर्गोत्सव एका लोकोत्सवाचे स्वरूप घेत विश्वविक्रम प्रस्थापित करेल यासाठी आपल्या विभागाचा मोठा हातभार लागेल अशी अपेक्षा आहे.

स.स. (मांशी)
उ.स. (मशी / विशी / सम.)

आपला

(राजेश कुमार)

प्रति,

श्री. बी. वेणूगोपाल रेड्डी, प्रधान सचिव
उच्च शिक्षण विभाग,
मंत्रालय मुंबई ३२

विशि-५
७/१०/२५

प्राप्त दि. ०८/१०/२०२५

दूरध्वनी : कार्यालय ०२२-२२०२ ५० ४२/२२०२ ८७ ६२, फॅक्स : २२०२ ८५ ९४, ई-मेल : cs@maharashtra.gov.in

# "परिशिष्ठ –अ"

## दुर्गोत्सव साजरा करण्याची संहिता व वेळापत्रक

दुर्गोत्सवाची गरज :

बदलत्या काळाबरोबर झपाट्याने बदलणाऱ्या आपल्या समाजातील काही पारंपरिक व सांस्कृतीक रूढी लोपपावत चालल्या आहेत. दीपावली सणाच्या कालावधीत , मिळेल त्या जागेत, लहान थोरानी मिळून दुर्गांच्या प्रतिकृती बनवण्याची प्रथा ही आपल्या संस्कृतीशी निगडीत आहे. एक अभूतपूर्व अशी प्रथा प्रोत्साहनाअभावी नाहीशी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. बालगोपाळांच्या सहभागाने आपल्या इतिहास जिवंत करत महानायक शिवछत्रपतींना मानवंदना देणारा हा दुर्गोत्सवाचा उपक्रम अतिशय वैशिष्ट्यपूर्ण असून अशा स्वरूपाचा उपक्रम जगात कुठेही साजरा केला जात नाही.

जनसर्वेक्षणातून निदर्शनास आलेली काळजीची बाब म्हणजे जर कुठलेही प्रोत्साहन मिळाले नाही तर ही अफलातून परंपरा नामशेष होण्याची भीती आहे. यूनेस्को ने याच वर्षी छत्रपतींच्या बारा दुर्गांना जागतिक वारसा वास्तु असे प्रमाणित करत वैश्विक ख्याती मिळवून दिली, त्यामुळे या उपक्रमाला प्रोत्साहन देणाऱ्या लोकचळवळीचा श्री गणेशा करण्यासाठी ही वेळ अतिशय संयुक्तिक ठरते. अमृतच्या पुढाकारातून महाराष्ट्र शासनाने आता महाराष्ट्रातील सर्व जनतेला या वैश्विक ख्याती प्राप्त शिवछत्रपतींना मानवंदना मानवंदना देण्यासाठी म्हणून दुर्गोत्सव हा लोकोत्सव साजरा करण्याचे निश्चित केलेले आहे.

संकल्पना :

१. शासनाकडून राज्यातील सर्व जनातेला आवाहन केले जाईल की त्यांनी अगदी जमेल तेथे या वैश्विक ख्याती प्राप्त असलेल्या व युनेस्को ने जागतिक वारसा स्थळांच्या यादीत समावेश केलेल्या या १२ दुर्गांच्या हुबेहूब प्रतिकृती बनवाव्यात. (१२ दुर्ग - रायगड, राजगड, प्रतापगड, सिंधुदुर्ग, साल्हेरदुर्ग, खांदेरीचा दुर्ग, जिंजी, पन्हाळगड, शिवनेरी, विजयदुर्ग, लोहगड, पद्मदुर्ग)
२. राज्यातील नागरिकांनी घरातील अंगणात, गृहसंकुलातील सार्वजनिक जागांमध्ये, बागेमध्ये, बाल्कनीत परिवारातील / कुटुंबातील सर्वानी मिळून वरीलपैकी कोणत्याही एका दुर्गाची उत्तम संजावतीसाह प्रतिकृती बनवणे अपेक्षित आहे.
३. अमृत संस्थेने खास दुर्गोत्सवासाठी बनवलेल्या (digital platform https://www.durgotsav.com/) व्यासपीठावर दुर्गोत्सवात बनविलेल्या दुर्गासोबत सेल्फी फोटो काढून हा फोटो अपलोड करावा. त्यासाठी संबंधित फॉर्म भरताना स्वतःचे नाव आणि इतर तपशील नमूद करावा.
४. दुर्गांचा फोटो अपलोड केल्यानंतर फोटोची वैधता/ सत्यता पडताळणी अमृत संस्थेमार्फत करण्यात येणार आहे.

५. अपलोड केलेल्या फोटोची वैधता/ सत्यता सिद्ध झाल्यानंतर, भाग घेणाऱ्या प्रत्येकास शासनाच्या वतीने माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या स्वाक्षरीचे "अभिनंदन पत्र" digital स्वरूपात, वैधता पडताळणीनंतर २४ तासांत https://www.durgotsav.com/ या संकेतस्थळावरुनच डाउनलोड करून घेता येईल. (सदारची लिंक मोबाईलवर उपलब्ध करून देण्यात येणार आहे.)

दुर्गोत्सवात सहभाग घेणाऱ्यांना मिळणारे लाभ :

१. मा. मुख्यमंत्री महोदयांच्या स्वाक्षरीचे डिजिटल स्वरूपातील “अभिनंदन पत्र”.
२. "शिवचरित्रातून आज घ्यावयाचे धडे" या विषयावरील उत्कृष्ट अशा डिजिटल स्वरूपातील म्हणजेच ऑडिओ आणि व्हिडिओ स्वरूपातील गोष्टींचे संकलन निशुल्क उपलब्ध होईल.

सोहळ्याचे वेळापत्रक

१२ ते २५ ऑक्टोबर - नोंदणी https://www.durgotsav.com/ येथे करणे.

१० नोव्हेंबर - शिवप्रताप दिवस. विश्वविक्रम प्रमाणपत्र स्वीकारण्याच्या सोहळ्याचा कार्यक्रम.

महाराष्ट्र शासन


महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी
अमृत

# ॥ अभिनंदन पत्र ॥

अमृत दुर्गोत्सव २०२५

महाराष्ट्र शासनाच्या अविरत प्रयत्नांमुळे शिवछत्रपतींच्या पराक्रमाची साक्ष असलेल्या बारा दुर्गांना जागतिक वारसा वास्तू म्हणून वैश्विक ख्याती मिळालेली आहे. या अनुषंगाने राजे शिवछत्रपतींना मानवंदना प्रदान करण्यासाठी आयोजित दुर्गोत्सव 2025 मध्ये

______________________________ आपण सक्रिय सहभाग नोंदवून या ऐतिहासिक व सांस्कृतिक वारशाच्या जतन संवर्धन कार्यात आपले योगदान दिले त्याबद्दल आपले मनःपूर्वक अभिनंदन.



मी आणि माझा दुर्ग
सहभागी क्र. ५७५७४

चला दुर्ग बनवूया!

देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री, महाराष्ट्र शासन

